# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - २८ मे २०२४

---

जळगाव दि.२८ (प्रतिनीधी) : बंगळूरू विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्त्र महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाला कास्य पदक प्राप्त झाले.

बंगळूरू विद्यापीठात दि. १३ ते १८ मे दरम्यान अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) क्रीडा स्पर्धा झाली. या स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने कालीकत विद्यापीठवर ५ - ० ने विजय मिळवित पात्रता फेरीत प्रवेश केला व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी झालेल्या सामन्यात ७ - ३ ने विजय मिळवित कास्य पदक पटकावले.

या संघामध्ये मोहित चौधरी, वेदांत आर्डे, अनिकेत पाटील, चिराग देवरे, निलेश जावरे, मोहित पाटील, (सर्व जेडीएमव्हीपीएस महाविद्यालय,जळगाव), धिरज बाविस्कर,राज भिलारे, गौरव चौधरी, मयुरेश औसेकर (मु.जे.महाविद्यालय, जळगाव) सिध्दांत पाटील, ललीत बाविस्कर (धनदाई माता महाविद्यालय,अमळनेर ), स्वप्नील मोरे, लोकेश चौधरी, (पी.एम.जी.व्ही.पी.महाविद्यालय शहादा), उमेश विसपुते (सदगुरू शा.शि.महाविद्यालय,जळगाव) या विद्यार्थ्यांचा समावेश होता. संघ प्रशिक्षक म्हणून प्रा.संजय जाधव (जी.एच.रायसोनी महाविद्यालय,जळगाव) यांनी काम पाहिले. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी अभिनंदन केले अशी माहिती क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांनी दिली.

---

बातमी क्र. २

जळगाव दि.२८ (प्रतिनीधी) : दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेऊन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्त्र महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाच्या वतीने दि. ४ ते ६ जून या कालावधीत विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांचे क्रिडा संचालक/रासेयो संबंधीत व्यक्तींना ऑनलाईन योगा प्रोटोकॉल प्रशिक्षण दिले जाणार आहे.

२१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षी योगा फॉर वुमन ऍम्पावरमेंट अशी संकल्पना घोषीत झाली आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या वतीने ३ दिवस ऑनलाईन स्वरुपात योगा प्रोटोकॉल प्रशिक्षण दिले जाणार आहे. अधिक माहितीसाठी योगशास्त्र विभागातील प्रा.गीतांजली भंगाळे, अथवा डॉ.लिना चौधरी यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन प्रभारी विभागप्रमुख इंजि. राजेश पाटील यांनी केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील
जनसंपर्क अधिकारी